**MHSO100000942017**

<u>नि.द.क्र.०८/२०१७ मधील निशाणी क्र.४० खालील आदेश</u>

हुकूमनामाधारकांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ रमेश नारायण ढाळे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ हा ता.०४.०१.२०२४ रोजी मयत झाला असून त्याला श्रीमती शोभा रमेश ढाळे, प्रिती गणेश बुधनवर, माधुरी वैभव विरकर, रुपाली प्रज्योत ढाळे, अजय रमेश ढाळे व विजय रमेश ढाळे असे वारस आहेत. सदरचे प्रतिवादींचे वारस सुध्दा वादीला दरखास्तीमधील मिळकतीचा कब्जा घेण्यास हरकत करत असल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांची नावे दरखास्तीमध्ये प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणुन समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास न्यायनिर्णीत ऋणको यांनी नि.क्र.४५ वर जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र.१ चे वारसांविरुध्द दरखास्त चालविण्याचा अधिकार वादींना नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयांवर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित

आहेः–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ...होय. |
| २. | आदेश काय? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी हुकूमनामाधारकांतर्फे विद्वान वकील श्री.कुलकर्णी व न्यायनिर्णीत ऋणको यांच्यातर्फे विद्वान वकील श्री.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणामधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.१ हा ता.०४.०१.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१ याचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. हुकूमनामाधारकांना प्रतिवादी क्र.१ च्या वारसांविरुध्द सदरची दरखास्त चालविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या वारसांची नावे मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस म्हणुन दरखास्तीत समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**नि.क्र.४० खालील आदेश.**

## आदेश

सदरचा निशाणी क्र.४० चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.25 11:31:07 +0530

दि.२२.०९.२०२५. (सो. द. घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

माळशिरस.

**नि.क्र.४० खालील आदेश.**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.२५.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.२५.०९.२०२५. (श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.